# MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

MERC

13th Floor, Centre No.1, World Trade Centre, Cuffe Parade,
Mumbai-400 005. **Tel.** 22163964 / 22163965
**E-mail:** mercindia@merc.gov.in **Website:** www.merc.gov.in

**Advertisement No. Advt. 31/2023**

## PUBLIC NOTICE

### Inviting Suggestions/Objections on Draft MERC (Forecasting, Scheduling and Deviation Settlement for Solar and Wind Generation) (First Amendment) Regulations, 2023

1. The MERC (Forecasting, Scheduling and Deviation Settlement for Solar and Wind Generation) Regulations, 2018 (the principle Regulations) were notified on 20 July 2018 with the objective to facilitate Grid integration of Wind and Solar energy generated in Maharashtra while maintaining Grid stability and security. Having gained experience in implementation of forecasting and scheduling for Solar and Wind Generators, the Commission, in exercise of the powers conferred under Regulation 4.2 of these Principal Regulations, has reviewed certain aspects related to Payment to these generators, Accuracy Band and Deviation Charges based on the developments at Central/State level in last 3-4 years and has prepared the MERC (Forecasting, Scheduling and Deviation Settlement for Solar and Wind Generation) (First Amendment) Regulations, 2023.
2. These Draft Regulations along with the Explanatory Memorandum have been uploaded on the Commission's website **www.merc.gov.in (https://www.merc.gov.in/regulation_type/draft-regulations/)** in downloadable format.
3. Any comments, suggestions or objections on the draft amendment Regulations may be uploaded within 30 days through **'E-Public Consultation'** Tab on MERC Website (**www.merc.gov.in/e-public-consultation**). In case of any difficulty in accessing this feature, concerned stakeholders can contact the MERC Office Mobile No.: 8928071522 or on email id: **suggestions@merc.gov.in between 9.30 AM to 6.00 PM** on all the working days. A Person who has uploaded suggestion and objection on 'E-Public Consultation' Tab need not file any hard copy of its submission. Persons who do not have access to electronic media, can file their suggestions and objections in a hard copy addressed to 'The Secretary', Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC), 13th Floor, Centre No.1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005, before **5 PM on 22 January 2024.** Suggestions/ Objections filed through any other mode shall not be considered.
4. All Comments, Suggestions and objections uploaded or received on or **before 22 January 2024** shall be considered by the Commission before finalizing the above Draft Regulations.All future communication on this issue will be through MERC website only (**www.merc.gov.in**)

Sd/-
**(Dr. Rajendra G. Ambekar)**
**Secretary,**
**Maharashtra Electricity Regulatory Commission**

**Place : Mumbai**
**Date : 22 December, 2023**

**Size : 8 (W) x 15 (H)**

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा,
मुंबई–४०० ००५ **दूरध्वनी:** २२१६३९६४ / २२१६३९६५
**संकेत स्थळ:** www.merc.gov.in **ई–मेल:** mercindia@merc.gov.in

**जाहिरात क्र. ३१/२०२३**

## जाहीर नोटीस

### प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्यूलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०२३ वर सूचना / हरकती मागविण्याबाबत

१) ग्रीडचे स्थैर्य आणि सुरक्षितता राखतानाच महाराष्ट्रात निर्माण झालेली पवन आणि सौर ऊर्जा ग्रीडमध्ये संकलित करण्यास चालना देण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्यूलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) विनियम, २०१८ ( मुख्य विनियम) दि. २० जुलै, २०१८ रोजी अधिसूचित केले होते. सौर आणि पवन निर्मात्यांसाठी पूर्वानुमान आणि शेड्यूलिंगच्या अंमलबजावणीचा अनुभव प्राप्त झाल्यावर, आयोगाने, मुख्य विनियमांच्या विनियम ४.२ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मागील ३–४ वर्षांमध्ये केंद्र / राज्य पातळीवर झालेल्या घडामोडींच्या आधारावर निर्मात्यांची प्रदाने, अचूक बॅण्ड आणि तफावत आकारांशी संबंधित बाबींचा आढावा घेतला आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्यूलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०२३ तयार केले आहेत.

२) वरील प्रारूप विनियम, त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in (https://www.merc.gov.in/regulation_type/draft-regulations/)** या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३) प्रारुप सुधारणा विनियमांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या (www.merc.gov.in/e-public-consultation) संकेत स्थळावरील '**E-Public Consultation**' या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी ०९.३० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई–मेल आयडीवर आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात. **'E-Public Consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची **छापील प्रत** आयोगाचे सचिव यांना संबोधित करुन, **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०००05 या पत्त्यावर दि. २२ जानेवारी, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी.** अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना / हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

४) **२२ जानेवारी, २०२४** रोजी किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती वरील प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २२ डिसेंबर, २०२३**

**Size : 8 (W) x 15 (H)**